## विविध एन.सी.सी. पारितोषिके

## सुधारित नियमावली

१. दरवर्षी सदरचे पारितोषिक हे शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्थेत एन.सी.सी. मध्ये असणा–या छात्रसैनिक यांच्यामधून गुणवत्तेनुसार सर्वप्रथम येणा–या पहिल्या तीन मुलांना व छात्रसैनिका यांच्यामधून पहिल्या तीन मुलींना देण्यात येईल. यासाठी एन.सी.सी. भवन, कोल्हापूर यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होणारे नामांकन ग्राहय धरण्यात येईल व सदर पारितोषिके जाहीर करण्याची कार्यवाही दरवर्षी पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत करण्यात येईल.

२. सदर पारितोषिकांचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पारितोषिकाचे नाव | पारितोषिकाचे स्वरूप |
|---|---|---|
| | **तीन विद्यार्थी** | |
| १. | **दि छत्रपती शिवाजी महाराज प्राईज**<br>विद्यार्थ्यांच्यामधून प्रथम येणा–या छात्रसैनिकास | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |
| २. | **दि लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात मेमोरिअल प्राईज**<br>विद्यार्थ्यांच्यामधून व्दितीय येणा–या छात्रसैनिकास | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |
| ३. | **दि कॅप्टन जयसिंग जॉर्ज 'ए' जाधव मेमोरिअल प्राईज**<br>विद्यार्थ्यांच्यामधून तृतीय येणा–या छात्रसैनिकास | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |
| | **तीन विद्यार्थिनी** | |
| १. | **दि रणरागिणी ताराराणी प्राईज**<br>विद्यार्थिनींच्यामधून प्रथम येणा–या छात्रसैनिकेस | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |
| २. | **दि लेफ्टनंट जनरल एस.पी.पी. थोरात मेमोरिअल प्राईज**<br>विद्यार्थिनींच्यामधून व्दितीय येणा–या छात्रसैनिकेस | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |
| ३. | **दि कॅप्टन जयसिंग जॉर्ज 'ए' जाधव मेमोरिअल प्राईज**<br>विद्यार्थिनींच्यामधून तृतीय येणा–या छात्रसैनिकेस | **रोख रू.१६००/– व प्रमाणपत्र** |

३. उपरोक्त पारितोषिकाकरीता विद्यार्थ्याने मागील शैक्षणिक वर्षात भाग १, भाग २ अथवा भाग ३ उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त सर्व पारितोषिके दीक्षांत समारंभात व्यासपीठावर प्रदान करण्यात येतील.

५. सदरची अंमलबजावणी ही मार्च/एप्रिल, २०१६ च्या परीक्षेपासून करण्यात येईल.